# अपर पोलीस आयुक्त

**पूर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर यांचे कार्यालय**

**मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे स्टेशन जवळ, पुणे ४११ ००१**

**संपर्क क्र. ०२० - २६११४६०४** email - addlcpnorth.pune@nic.in


**जा. क्र.** अपोआ/वाचक-२/ /२०२४, पुणे शहर | दिनांक : /०७/२०२४

## प्रेसनोट

पुणे शहरातील नागरिकांचे वाहतूक कोंडीतुन सुटका व वाहतूक वेळ कमी करण्यासाठी शहरातील वाहतूक वाहिन्या असलेल्या मुख्य ३२ रस्त्यांवर चौक सुधारणा, पार्किंग मॅनेजमेंट, वाहतूक नियंत्रण साधने, वाहतूक विलगीकरण टेक्नीक्स इ. माध्यमातुन अभिनव योजना राबवण्यात येणार आहे. यामध्ये गुगल बरोबर करार करुन वरील सुधारणा करण्यात येणार आहेत. वाहतूक शाखा व पुणे महानगरपालीका यांचे समन्वयातुन एक ॲप्लीकेशन तयार करण्यात येणार असुन याद्वारे ट्रॅव्हल टाईम कमी करणे तसेच पुणे शहरातील रस्त्यांची कॅरींग कॅपेसिटी वाढवण्यात येणार आहे.

मा. पोलीस आयुक्त पुणे शहर व अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पुणे शहरातील रस्त्यांचे त्यांचे उपयोगानुसार वर्गिकरण करुन त्यावर रस्त्याबाबत काम करणा-या इतर स्थानिक प्राधिकरणांचे मदतीने विशेष उपाययोजना करण्याचा प्रोजेक्ट सुरु करण्यात येणार आहे.

प्रोजेक्ट कामी निवडलेले मुख्य रस्ते हे शहरातील जास्तीत जास्तीत वाहतूक असणारे रस्ते आहेत. या मुख्य रस्त्यांवर वाहतूकीची गती संथ असेल अथवा या रस्त्यावर जर वाहतूक कोंडी होत असेल तर त्याचा ताण शहरातील अंतर्गत रस्त्यांवर येतो त्यामुळे नागरिकांना शहरातील अंतर्गत निवासी रस्त्यांवर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. या मुख्य रस्त्यांवरील वाहतूकीचा वेग वाढवण्यासाठी या रस्त्यावर चौक सुधारणा, अद्ययावत सिग्नल यंत्रणा, पार्किंग मॅनेजमेंट, स्पिड ब्रेकर्स, रस्त्याची सरफेसींग, रस्त्यावरील अतिक्रमण काढणे, रस्त्यावर वाहतूक नियंत्रणाची साधने बसवणे, रस्त्यामधील मिसींग लिंक्स पुर्ण करणे, रस्त्यावरील वॉटर लॉगींग पॉईंटस दुरुस्त करणे, या रस्त्यांवर नो हॉकर्स झोन करणे व त्याची अंमलबजावणी करणे, रस्त्याबाबतच्या प्रलंबित कोर्ट केस बाबत पाठपुरावा करणे, रस्त्यांवरील अडथळा आणणा-या झाडांबाबत उचित उपाययोजना करणे, अडथळा करणा-या आस्थापनांवर कारवाई करणे तसेच या रस्त्यांवर वाहतूक विलगीकरण टेक्नीक्सचा वापर करणे असे सर्व आवश्यक कामे हे पुणे महानगर पालीका व इतर प्राधिकरणांचे समन्वयातुन करण्यात येणार आहेत.

शहरातील या मुख्य रस्त्यांना प्राधान्यक्रम देवुन कॅरेज विड्थ वाढवल्यास या रस्त्यावरुन वाहतूकीचा वेग वाढुन मुख्य रस्त्यांची कॅरींग कपॅसिटी वाढेल. वाहन चालकांचा मुख्य रस्त्यांवरुन जाण्याचा कल वाढवल्यास अंतर्गत रहिवाशी रस्ते, व्यापारी रस्ते व कलेक्टर स्ट्रिट यावरील ताण कमी हाईल. मुख्य रस्त्यावरुन वाहनांना एका सरासरी वेगाने जाता आले तर त्या रस्त्याची कॅरींग कपॅसिटी वाढते म्हणजे वाहनांची संख्या वाढेल आणि जर सरासरी वेगापेक्षा कमी किंवा जास्त वेगाने वाहने गेली तर रस्त्यावर जाणा-या वाहनांची संख्या घटते, हे आपणास पुढील चार्टवरुन निदर्शनास येईल, त्यामुळे वाहनांना सरासरी वेग प्राप्त होईल





Fig 1. Speed.volume curve showing levels of service

या प्रोजेक्ट करिता पुणे महानगरपालीका व वाहतूक शाखा पुणे शहर हे एकत्र मिळुन एक मोबाईल ॲप विकसीत करणार आहेत या द्वारे वाहतूक शाखेचे विभाग व महानगरपालीका यांचे क्षेत्रीय कार्यालय यांचा समन्वय साधुन चौक सुधारणा व मुख्य रस्त्यावरील सुधारणा व नियोजन करण्यात येणार आहे. तसेच भविष्यात हे ॲप नागरिकांना उपलब्ध करुन देवुन त्याद्वारे नागरिकांना त्यांचे भागातील समस्या नोंद करता येतील तसेच त्याचे झालेले निराकरण पाहता येईल. वाहतूक शाखेचे नियोजन पाहता येईल तसेच वाहतूक सुधारणा बाबत सुचना करता येतील.


वाहतूक शाखेकडुन या मुख्य रस्त्यावर केले जाणारे उपाययोजना सोबत शहरातील पार्किंग व्यवस्था, शहरातील वाहतूक कोंडी, वाहतूकीमध्ये करण्यात आलेले बदलाबाबतचे नोटीफिकेशन, बस स्टॉप, ॲटो स्टॅण्ड तसेच पिएमपीएल स्टॉप इत्यादी आवश्यक माहिती मिळण्यासाठी पुणे शहर वाहतूक शाखेने **गुगल सोबत वैशिष्टपुर्ण करार** केलेला आहे त्याची अंमलबजावणी येत्या काळात सुरु होणार आहे.

शहरात होणा-या अपघातांचे प्रमाण कमी करण्याकरीता वरिल उपाय योजनांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होणार आहे. तसेच होणा-या अपघातांच्या कारणांचे मानवी व अभियांत्रीकी चुका यामध्ये वर्गीकरण करण्यात येत आहे. तसेच जखमींना उपचार मिळणेसाठी लागलेला कालावधी याबाबत विश्लेषण करण्यासाठी सेव्ह लाईफ फाऊंडेशन यांचेशी समन्वय करण्यात येत आहे. या माध्यमातुन अपघातचे प्रमाण कमी करण्याचा मानस आहे.

**निवडण्यात आलेल्या ३२ रोडची यादी खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र | रोडचे नाव | प्रोजेक्ट मार्ग |
|---|---|---|
| १. | सोलापुर रोड | जेधे चौक -भैरोबा नाला- रामटेकडी जंक्शन - वैदवाडी जंक्शन – कवडीपाट टोलनाका – नायगाव फाटा |
| २. | **खराडी बायपास ते मगरपट्टा रोड** | खराडी बायपास - मुंढवा चौक - मगरपट्टा - सोलापुर रोड हडपसर |
| ३. | **नॉर्थ मेन रोड ते सोलापुर रोड** | ताडी गुत्ता - जहांगीरनगर - हॉटेल चुल मटण, सोलापुर रोड |
| ४. | **पुणे सासवड रोड** | हडपसर गाडीतळ ते दिवे घाट |
| ५. | **कात्रज मंतरवाडी बायपास** | नवले पुल - गोकुळनगर - खडी मशीन चौक -उंड्री चौक -मंतरवाडी फाटा |
| ६. | **नगर रोड** | बोपोडी जंक्शन – खडकी बाजार - होळकर ब्रिज – चंद्रमा चौक – पर्णकुटी चौक – विमाननगर चौक – खराडी जकात नाका – कोरेगाव भिमा. |
| ७. | **नविन एअर पोर्ट रोड** | ए बी सी फार्म चौक - रामवाडी जंक्शन – एअरपोर्ट |
| ८. | **जुना एअर पोर्ट रोड** | गुंजन चौक – ५०९ चौक – एअरपोर्ट |
| ९. | **आळंदी रोड** | चंद्रमा चौक ते बोपखेल फाटा |
| १०. | **जुना पुणे-मुंबई रस्ता** | आरटीओ चौक ते हॅरीस ब्रिज |
| ११. | **सातारा रोड** | जेधे चौक ते कात्रज बोगदा |
| १२. | **सिंहगड रोड** | जेधे चौक ते नांदेड सिटी |
| १३. | **शास्त्री रोड** | टिळक चौक ते दांडेकर पुल |
| १४. | **नेहरु रोड** | पुणे स्टेशन - सेव्हन लव्ह चौक- गंगाधाम चौक - हॉटेल कान्हा |
| १५. | **बाजीराव रोड** | सावरकर पुतळा चौक ते गाडगीळ पुतळा चौक , लक्ष्मीनारायण – मित्र मंडळ चौक – पुरम चौक |
| १६. | **शिवाजी रोड** | सिमला ऑफीस चौक -रामेश्वर चौक - जेधे चौक |
| १७. | **संताजी घोरपडे रोड** | गाडगीळ पुतळा चौक ते शाहीर अमर शेख चौक |
| १८. | **नॉर्थ मेन रोड** | कोरेगाव पार्क जंक्शन -एबीसी फार्म - ताडीगुत्ता चौक - मुंढवा चौक – केशवनगर |

| | | |
|---|---|---|
| १९. | साधु- वासवानी मार्ग | नेहरु चौक ते जहांगीर हॉस्पिटल |
| २०. | बंडगार्डन रोड | दोराबजी मॉल ते मंगलदास चौक |
| २१. | डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड | आरटीओ चौक ते तीन तोफा चौक |
| २२. | एम.जी.रोड | गोळीबार मैदान ते आंबेडकर पुतळा |
| २३. | प्रिन्स ऑफ वेल्स रोड | भैरोबा नाला - लुल्लानगर – बिबवेवाडी |
| २४. | कोंढवा मेन रोड | गोळीबार मैदान – ज्योती हॉटेल – खडी मशिन चौक |
| २५. | जंगली महाराज रोड | संचेती चौक ते खंडोजी बाबा चौक |
| २६. | एफ.सी. रोड | खंडोजी बाबा चौक ते नता वाडी चौक |
| २७. | गणेशखिंड रोड | संचेती हॉस्पिटल ते पुणे विद्यापीठ चौक |
| २८. | सेनापती बापट रोड | एस बी जंक्शन – सिम्बॉयसिस कॉलेज - लॉ कॉलेज रोड - नळ स्टॉप |
| २९. | बाणेर रोड | पुणे विद्यापीठ चौक ते हॉटेल राधा चौक |
| ३०. | पौड रोड | पौड फाटा ते चांदणी चौक |
| ३१. | कर्वे रोड | खंडोजी बाबा चौक ते वारजे जंक्शन |
| ३२. | कन्हेरे रोड | नळ स्टॉप - म्हात्रे पुल - सेनादत्त पोलीस चौकी शास्त्री रोड |




(मनोज पाटील)
अपर पोलीस आयुक्त,
पुर्व प्रादेशिक विभाग, पुणे शहर



